**Historicity Research Journal**
**Volume 1 | Issue 6 | Feb 2015**
**ISSN:- 2393-8900**

Research Article

# *आदिवासी लोकसंस्कृतीचा कलात्मक आविष्कार “वारली व वारली चित्रकला”*

*वंदना विनायक नढे*

मराठी विभाग , श्री शिव छत्रपत्ती महाविद्यालय , जुन्नर.

***सांराश :***

भारतामध्ये आदिवासी म्हणून संबोधल्या गेलेल्या समूहांना अनुसूचित जमातीचा दर्जा देण्यात आला. आदिवासी याचा अर्थ त्या त्या ठिकाणाचे मूळ रहिवासी असा होतो. रामायणतील शबरी महाभारतातील एकलव्य या व अशा व्यक्तिरेखा भारतीय पुराणातही आहेत. मानवी जीवनाचे आद्य स्वरूप म्हणजे आदिवासीच असून त्यांचा उल्लेख ‘निषाद’ म्हणून केलेला आहे. 17 व्या शतकातील ऐन–ए–अकबरी मध्येही आदिवासींचा उल्लेख आढळतो.

## *प्रस्तावना :*

भारतात जवळजवळ 300 आदिवासी जमाती आहेत व एकूण लोकसंख्येच्या 8.3ः इतके त्यांचे प्रमाण आहे. महाराष्ट्रात एकूण लोकसंख्याच्या 9.6% लोकसंख्या आदिवासी समाज हा मध्य भारतात म्हणजेच मध्यप्रदेश, महाराष्ट्र, झारखंड, छत्तीसगड, आंध्रप्रदेशात आहे. तसेच गुजरात, कर्नाटक, राजस्थानातही त्यांचे प्रमाण अधिक आहे. महाराष्ट्रातील 15 जिल्हयात आदिवासी समाज असून एकूण 47 आदिवासी जमाती महाराष्ट्राम आहेत. त्यांचे 3 भाग आहेत :–

1.सातपुडा गट– भिल्ल व कोरकू
2.सहयाद्री पर्वत व पठारीप्रदेश– महादेव कोळी, वारली, ठाकर, कोकणा व कातकरी
3.गोंडवन गट – गोंड, परधान, कोलम, दाडिया हे प्रामुख्याने येतात.

## *वारली परिसर :–*

वारली ही भारतातील एक अनुसूचित जमात आहे. वारली लोकांची वस्ती मुख्यत्वे महाराष्ट्र, गुजरात व कर्नाटक या राज्यात तसेच दाद्रा व नगर, हवेली या केंद्रशासित प्रदेशात आहे. महाराष्ट्र राज्याच्या ठाणे जिल्हयातील जव्हार–मोरवाड व नासिक जिल्हयात त्यांची वस्ती आधिक प्रमाणा आढळते. वारली लोकांत ‘मुरडे’, ‘डावर’ व ‘निहिरे’ असे तीन प्रादेशिक भेद आहेत. ‘मुरडे’ व ‘डावर’ हे ठाणे जिल्हयाच्या उत्तरेकडील भागात आढळतात. तर ‘निहिरे’ वारल्यांची वस्ती पालघर, माहिम, जव्हार, वाडा या भागात आहे.

वारली लोकांत भांगर, भावर, जाधव, किरकिरे, निंबोरे, रानवार, वांगड इ. काही कुळे आहेत वारली लोकांची खेडी विखुरलेल्या झोपडयांच्या गटागटांनी वसलेली असतात. या वस्तीच्या गटाला ‘पाडा’ म्हणतात. दहा–बारा पाडयांचे एक खेडे असते.

## *वारली या नावाची व्युत्पत्ती–*

वारली जमात महाराष्ट्राच्या धरमपूर भागात फार पुरातन काळापासून राहात असावी, असा बऱ्याच शास्त्रज्ञांचा तर्क आहे. मेगॅस्थेनिसने आपल्या प्रवासवर्णनात या भूप्रदेशाला ‘वरलाट’ असे संबोधले असून इथे राहणाऱ्या वन्य जमातीला वारली असे म्हणतात. या वारली जमातीची या भागात पूर्वी राज्ये होती. आज जव्हार तालुका म्हणून

ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशात जे कोळयांचे राज्य होते ते मूळचे वारली जमातीचे होते, अशी दंतकथा सांगितली जाते.

वारली या नावाच्या व्युत्पत्तीबद्दल विद्वानांत मतैक्य नाही. तत्संबंधी अनेक कथा, दंतकथा, व वदंता प्रसृत झाल्या आहेत. प्राचीन साहित्यातही या जमातींचा भिन्न नावांनी उल्लेख आढळतो.

1) कात्यायनाने एका वार्तिकात विंध्य व सातपुडा, या पर्वतांच्या आसपासच्या प्रदेशाची माहिती देताना निषाद, व्यास व वरूड या तीन अनार्य जमातींचा उल्लेख केला आहे. त्यापैंकि 'वरूड' म्हणजे वारली होत, असे वि.का. राजवाडे यांनी महिकावतीच्या बखरीत म्हटले आहे.
2) वरूड शब्दावरूड वरूड–वरूडाई–वरूलाई–वारूली–वारली अशी त्यांनी व्युत्पत्ती दिली आहे.
3) डॉ. विल्सन यांच्या मते दक्षिणेतील सात कोकणांपैकी 'वरलाट' हया कोकणात राहणारे ते 'वारली', अशी या शब्दाची व्युत्पत्ती आहे.
4) आर. इ. एन्थोवेन व लॅथॅम हे वारली ही भिल्लांचीच एक पोटजात असल्याचे नमूद करतात.

बिहार मधील 'संथाळ' व 'हो', ओरिसातील –'सोआरा', मध्यप्रदेशातील 'गोंड' व 'परधान' व महाराष्ट्रातील 'गोंड', 'परधान' व 'वारली' या आदिवासी जमाती भिंतीचित्रे कलात्मक पद्धतीने काढतात.

### *वारलीची लोकसंस्कृतीः –*



महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यात निसर्गाच्या सान्निध्यात राहणाऱ्या आदिवासींच्या जीवनाची जडणघडण व संस्कृतीत निसर्गाचे फार मोठे वरदान आहे. आदिवासीच्या प्रत्येक वस्तूमधून त्यांच्या संस्कृतीचे, भावनांचे व श्रद्धांचे नितांत सुंदर चित्रण दिसून येते. या कलाविष्कारात सृजनात्मकता आहे. विचारांची ऊर्मी आहे. ही कला उपयुक्ततावादी आहे, प्रतिकूल जीवनपद्धतीत विरंगुळा देणारी कला आहे. आदिवासींच्या प्रत्येक कलाकृतीत कल्पना, विचार, धर्म व श्रद्धांचा पगडा आहे.

पुराश्मयुगीन काळापासूनच मानवाची चित्र संस्कृती आकार घेऊ लागली. दैनंदिन जीवनाच्या अनुभावतूनच या आद्य कलेचा जन्म झाला. या चित्रकलेचा हा वारसा आजही काही आदिवासी जमाती टिकवन आहेत. आदिवासी चित्रसंस्कृती ही पराश्मयगीन चित्रकलेशी साधर्म्ये दाखविते.

जवळ जवळ सर्वच आदिवासींमध्ये भिंतीवर चित्रे काढण्याची प्रथा आहे. त्यांच्या भिंतीवरील विषय निसर्गाशी संबंधित असतो. मध्यप्रदेशातील 'भिल्ल, भिल्लाला व रठवा' या आदिवासी जमातींमध्ये 'पिठोर' हा सण म्हणून देखीन साजरा होतो. चित्रे काढण्याच्या स्वरूपातील हा सण असतो त्यालाच 'पिठोरा लिहिणे ' व 'घोडा पाडणे' असे म्हणतात. पिठोरा लिहिणाऱ्याला म्हणजेच चित्रे काढणऱ्याला 'लखिंद्र' असे म्हणतात. तो देवाचा पुजारीही असतो. भिंतीला शेणाने किंवा गेरूने आधी सारवले जाते. भिंत वाळली की तेथेच उपलब्ध असलेल्या रंगांनी लखिंद्र चित्रे काढली जातात.

रूढी, परंपरा व लोकजीवनाचे दर्शन या चित्रसंस्कृतीतून होत असते. चित्रे काढणारी व्यक्ती चित्रे काढताना व रंगविताना भारावलेल्या अवस्थेत असतो. त्याच्या हातून चित्रे काढण्याची क्रिया घडते तो केवळ एक माध्यम असतो चित्रे काढण्यामागील प्रेरणा अद्भूत असते. त्याला असलेल्या दैवी शक्तीचा आकलनानेच तो चित्रे काढतो, अशी आदिवासींची श्रद्धा असते. चित्रकला या जमातीच्या जीवनाचे एक अविभाज्य अंग आहे. म्हणून चित्राकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोण

समजावून घेणे म्हत्त्वाचे ठरते.

***वरली चित्रकला :–***



परंपरागत चालत आलेले निसर्ग प्रेम, सहल उपलब्ध साहित्यातूनझालेला उत्स्फूर्त अविष्कार म्हणजेच आदिवासी कला होय. वारली संस्कृतीत जीवात्म्याची कल्पना सर्वत्र आढळते.चित्र काढणे म्हणजेच 'जीव घडविणे' अशी त्यांची भावना असते.

चित्रांकन हे वारली लोकांच्या समजूतीनुसार त्यांच्या प्रेरणेचा विषय असतो. निरागसपणे वारली जीवनाचे प्रतिबिंब दाखविणारी ही कला अत्यंत बोलकी व जीवंत आहे. ही कला एक सहजगत्या उमलणारे भावविश्व आहे. त्यांचे वेगळं जग, सण, उत्सव, रीतिरिवाज, दैनंदिन जीवनातील अनेक प्रसंग त्यांच्यातून नकळत हळूवारपणे त्यांच्या कुडाच्या भिंतीवर चित्र साकार होत जातात.

भिंतींचे माध्यम हा वारली चित्रकलेचा 'कॅनव्हास' समजला जातो. त्यांच्या भिंतीवर आकृती व नक्षी यांची गर्दी झालेली दिसते. लग्नविधीचे संस्कार, देवदैवतांची आराधना, त्यांच्याकडून घरदाराचे, मुलाबाळांचे संरक्षण धनधान्यांची संमृद्धी, रोगराईच्या पीडे पासून संरक्षण अशा विविध उद्देशांनी त्यांनी ही चित्रे रेखाटलेली असतात.

वारली चित्रे, लाकडी कोरीव काम, मुखवटे, मृणमूर्ती, धातूकाम, पाषणमूर्ती, वाद्य, शिकारीची साधने व इतर कलात्मक वस्तू यांचा समावेश होतो. आदिवासी संस्कृती ही आज झपाटयाने बदलत आहे. तिला नवे संदर्भ प्राप्त होत आहेत.

***वारली चित्रांचे विषय किंवा आशय–***



मूळ देवाचा 'चौक' लिहिण्याच्या कल्पनेतून वारली चित्रकलेचा आविष्कार दिसतो. चित्रकलेचा परिपोष वारली संस्कृती, परंपरा व त्यांच्या सभोवतालच्या परिसरातील निसर्ग संपत्तीचा आधार घेऊन झालेला आहे. चित्रातील विषय प्रामुख्याने त्यांचा आदिम धर्म व नित्यनैमित्तिक जीवनातील दृष्ये हा असतो. त्यात भौमित्तिक रचनाबंध, शिकारीची दृष्ये, सुगीचा हंगाम, पाखडणे, नृत्य, मिरवणूक यांचाही समावेश होतो. यात कन्सारी देवता, पिशाच्च परिहार विधी इ. ना प्राधान्य असते. वारली चित्रकार निसर्गात जे पाहतात, अनुभवात त्याचे चित्रण तो प्रभावीपणे करतो त्यात निसर्गातील किडामुंगीपासून प्राणी, मानवीकृती व सभोवतालची सृष्टी व वृक्षवेली याचे अतिशय याचे सुरेख चित्रण केलेले असते. आतापर्यत ही कला प्रामुख्याने वारली महिलांनीच जोपासली आहे.

***वारली चित्रकलेतील रेषांची गुंफण–***

ही चित्रे लहान मुलांनी काढलेल्या चित्रांसारखी वाटतात. परंतु चित्रांचे आकार निसर्गातून प्रेरणा घेऊन तयार झालेले आहेत. त्या चित्रांतील आकार व रेषा प्रमाण बद्ध नसले तरी त्यांची निरिक्षणाची कल्पनाशक्तीची दाद द्यावी लागते. चित्रातील रंगसंगती, विषय आणि एकून भौमितिक आकारांच्या रचनेमुळे खूपच चित्तकर्षक आणि सुंदर होते.

चित्रसाठी सुचेल ते आकार ते गुंफत जातात. त्यासाठी रंगाचा कमीत कमी वापर करतात. साध्या रेषांच्या माध्यामातून संकेत व्यक्त होतात. त्यांच्या चित्रकलेत रेषाकृतीला व त्यापासून होणाऱ्या आकाराच्या गुंफणीला म्हत्त्व असते. रोजच्या जीवनातील त्यांच्या चित्रांत त्रिकोण, चौकोन, वर्तुळ हे मुलभुत आकाराच असतात. या सर्व चित्रांचा साचा एकच असून आडव्या–उभ्या रेषा, गोल आणि त्रिकोण यांच्या चित्रे पूर्ण होतात. वारली चित्रकार झाडे रंगविताना मूळापसून वर शेंडयापर्यत रंगवितात. अगदी सहजपणे त्यातून झाड उगविण्याची भावना प्रकट होते.

चित्र रेखाटन करताना तो आधी चित्र किती मोठे काढायाचे ते निश्चित करतो व त्या अनुषंगाने बाहेरील नक्षीकाम व मध्यवर्ती चित्रा भोवतालच्या आकृत्या व नक्षी क्रमाक्रमाने काढत जातो. प्रथम रेषाकृतीने ही कलाकृतीने ही कलाकृती तयार केली जाते. आर्श्चयकारक आकार वरचनांची प्रेरणा साध्या साध्या रेषा व वळणे यांच्या अवलोकनातून त्यांन मिळाते. उदा. चंद्राच्या गरगरीत आकारतून गोल, पानांच्या आकारातून गोल, त्रिकोण, अंडाकृती घेतला. वारली चित्र काढणाऱ्या महिला हया अशिक्षित असूनही जीवनातील घडामोडींचे त्यांच्या कलेत पडणारे प्रतिबिंब पाहून थक्क व्हायला होते.

## *चित्रकलेतील सांकेतिकता :–*

चित्रकलेतील संकेताची निर्मिती प्राचीन काळापासून चालत आलेल्या काही धारणा आणि समजुती यांतून झाली आहे. पांढऱ्या खुणा प्रेतात्म्याचा निदर्शक, तर लाल खुण मृतांच्या रक्ताचे प्रतीक, काळा रंग मगराच्या शक्तीचा निदर्शक, तर कुंकू हे निराळी असते. त्यातील संकेत वेगळे असतात. चित्र काढण्यामागे निश्चित असा हेतू असल्यास ते बेडूक चितरतात. दृष्ट शक्तीपासून घराचे रक्षण व्हावे असा चित्र काढण्याचा हेतू असेल तर सूर्यदेव, चंद्रदेव यांची चित्रे काढतात. लग्नातील चौक हे भूमीच्या अगम्य रूपाचे प्रतिक असते. मेळघाटाच्या कोरकू या आदिवासी जमातींचे लोक स्वस्तिक मोठया प्रमाणात काढतात. अशा रितीने चित्रकलेत सांकेतिकतेचा प्रभाव असतो. त्यातून काहीतरी सुचविण्याचा त्यांचा प्रयत्न असतो.

## *वारली भिंतीचित्रातील धार्मिकता–*

वारल्यांची भिंती चित्रे घराच्या दर्शनी भिंतींवर व मुख्य दरवाज्याच्या दोन्ही बाजूला काढलेली असतात. वारली लोकांच्या झोपडीवजा 'ओरवा' नावाची स्वयंपाकाची स्वतंत्र खोली असते. ओवऱ्याच्या बाजूला बैठकीच्या खोलीतील भिंतीवरील ही चित्रे रंगविलेली दिसतात. घराच्या भिंती सणावाराला घराच्या भिंती रंगविण्याची वारली लोकांची प्रथा आहे. अशा सारवणानंतर वारली स्त्रिया भिंतीवर चित्रे काढतात. मुख्यतः ही भिंती चित्रे लग्न प्रसंगी काढली जातात. लग्न झालेली नवपरिणीत जोडपे ज्या घरात राहणार त्याच ठिकाणी त्यांचे लग्नाचे विधी होतात. लग्नाच्या विधीपूर्वी त्या घरातील दर्शनी भिंत तांबडया मातीने व शेणाने अथवा गेरूने सारवली जातात. त्यानंतर शेतातले भात आणून घरच्या उखळात ते कुटतात. त्यात पाणी घालून भिंत चितरणाऱ्यासाठी लागणारा पांढरा रंग तयार करतात. जंगलातल्या 'बहारी' च्या गवताची काडी किंवा भाताच्या चुगची काडी घेऊन ही चित्रे रंगविण्यासाठी कुंचला म्हणून वापरला जाते. ही भिंतीचित्रे रेखाटन करणाऱ्या बायकांना 'धवलेरी' असे म्हणतात. त्यांना बोलावले जाते. लग्नाच्या आदल्या दिवशी मांडवा घातला जातो. याच दिवशी ही भिंतीचित्रे रेखाटण्याचे काम केले जाते. सात–आठ बायका (धवलेरी) मिळून हे चित्र पूर्ण करतात. या स्त्रियांना चित्रकलेचे कोणतेही शिक्षण दिलेले नसते. उपजत व परंपरेने ही कला त्या स्त्रिया आत्मसात करतात. आपल्या जाणिवा व कल्पनाशक्तीच्या जोरावर त्यांचे धार्मिक संस्कारच त्या चित्रात रेखाटत असतात.



चौक म्हणजे 'चौकोन'. हे भिंतीचित्रात सगळयात महत्त्वाचे चित्रण असते. देव चौकात देवतांचा वास असतो, अशी आदिवासींची भावना आहे. चौक रेखाटणारी व्यक्ती उपास करतो ते बांबूच्या काडीच्या साहाद्रयाने तांदळाच्या

आंबवलेल्या पीठापासून चित्र काढतात. म्हणून एखाद्या देवघरात त्यांची स्थापना करतात, पूजा करतात, त्याला नैवेद्यही दाखवतात. चौकोनाच्या रेषांच्या आतल्या बाजूला एका घोडयावर दोन मानवकृतींचे चित्रण केले जाते. या दोन आकृती म्हणजे नवरा – नवरी होत. लग्न होईपर्यत पाहू नये म्हणून ते कापडाने झाकून ठेवले जाते. या चित्रात चौकाखेरीज इतरही विविध देवदेवतांचे चित्रण असते.

या चौकाच्या भोवती केल्या जाणाऱ्या रेखाटन आदिवासी वस्तीतल्या कोंबडयाचे चित्रण आढळते. एक शिडीला 'निसन' म्हणून वारली लोक संबोधतात. भिंतीचित्रात 'फालगुट' देवीचे चित्रण अतिमहत्वाचे व अत्यावश्यक असते. ही देवता प्रजोत्पत्तीची देवत आहे. विवाहित जोडप्याला वारली वंशवृद्दीचा हा संकेत असतो. तिची पूजा हा लग्नविधीतील महत्तवपूर्ण संस्कार समजला जातो. याशिवाय तारपा, घांगाळी सांगळा वगैरे वाद्ये वाजविणारे वादक व एकमेकांच्या कमरेत हात गुंफून सर्पाकार, 'लघीत' मंडळ करून, फेर धरून नाचणारे नर्तक या सगळयांचे चित्रण या भिंतीचित्रांमध्ये केलेले दिसते.



नागपंचमी, दसरा, दिवाळीक्ष्च्या सणाच्यावेळी खूष उत्साहाने चित्र काढणाची चढाओढ हया महिलांमध्ये असते. सणसुदीला घराच्या बाहेर भिंतीवर काढलेली असतात. या खेरीज पानाफुलांच्या व पशु पक्ष्यांच्या व इतर भौमितिक नक्षीही भिंतीवर काढलेल्या असतात. क्वचित प्रसंगी ही चित्रे गेरूनेही काढलेली असतात. या चित्रांना 'पंचमीची चित्रे' या 'पिचवीची चित्रे' वा 'पिंचवीची चित्रे' असेही म्हणतात. पारंपारिक रूढीला संकेत या चित्रकृतीत दिसतो. घराच्या भिंतीवर काढलेल्या बहिराम, कणसरी माता, तेलरीन माता, घोडयावरील देवता इ. देवदेवतांची चित्र काढतात. त्या चित्रांमुळे धनधान्याची समृद्वी व्हावी. घरातील रोगराई जावी भूत, पिशाच्च, चेटूक याची बाधा घराला किंवा घरातील मुलाबाळांना होत नाही. अशी ही त्यांची समजूत आहे. या भिंती चित्रामुळे पूर्वजांचे आत्मे शांत होतात. देवदेवता खूश होतात. या भिंती चित्रे रेखाटनातील प्रवाहीपणा,मुक्तपणा व जोरकसपणा जाणवतो.

### *वरली चित्रकलेसाठी रंग –*

भिंतीचित्रे रंगविण्यासाठी वारली लोक नैसर्गिक रंगाचा म्हणजे पांढऱ्या रंगाचा वापर प्राधान्याने करतात. तांदळाची पेस्ट, झाडाचा चिक अगर सभोवतालच्या परिसरातील विविध रंगी पानांफुलांचा, झाडाच्या सालीचा रंगीत किडयांचा, वनस्पतीच्या विशिष्ट रसाचा, कोळशाच्या पुडेचा व रंगीत मातीचा उपयोग चित्रे काढण्यासाठी करतात. गडद निळा रंग – महाकुंच फूल, तांबडा रंग – मंजिष्ठा, पिवळा रंग – रानफणस, काळा रंग – कोळासा, लाल रंग – पळसाची फुले या खेरीज रंगीत माती व शेण, गेरू यांचाही वापर करतात. दृष्टत्यांना घरापासून दूर ठेवण्यासाठी काळया रंगाचा वापर करतात. त्यासाठी घराच्या उंबरठयावर व दरवाज्या सभोवताली काळया रंगाचा पांढऱ्या खुणांनी त्या घराण्यातील प्रेतात्म्याशी सख्य जोडले जाते. लाल खूणा या मृतांच्या रक्ताचे प्रतीक समजले जाते. काळया रंगाने भगताची ईश्वरी शक्ती दाखविलली असते. तर कुंकू हे समृद्वीचे प्रतीक समजले जाते. अशा रितीने वारली लोकांच्या चित्रकलेतील रंग संकेतांनी भरलेले असतात.

### *वारली चित्रांच्या विषयातील वैविध्यता –*

वारल्याच्या कुलदेवतेचे एक ठाणे 'महालक्ष्मी' येथे आहे.. या 'देवीच्या यात्रा' हा विषय चित्रकारांच्या चित्रांतून येतो. या वित्रातील विहाराचे आकारं म्हणजे आदिवासी कल्पकतेचा उत्तम नमुना आहे. चित्रकांराच्या मनातील उुर्मी, अनुभूती, सामाजिक, कल्पना, आजूबाजूचा निसर्ग यापैकी व त्यांच्याशी संबंधित अशा कोणत्याही विषंयावर चित्रे काढली जातात.

वारली चित्रासंस्कृतीत भातशेती हा विषय मुक्त हस्ते हाताळलेला असतो. भारताच्या खाचरा – तील जीव. साप, बेडूक, खेकडा, चिंचू, काम करणारी माणसे इ. शेतात कल्पकतेने दाखविलेली दिसतात. लग्न समारंभ हया

चित्रविषयात लग्नाची वरात, वऱ्हाड, मंडप, वांजत्री इ. बारीक सारीक बाबी त्यांनी चित्रात उत्तमरीत्या हाताळलेल्या असतात. ही चित्र कोणत्या तरी देवाला समर्पित केलेली असतात. त्यात त्यांच्या धार्मिक श्रद्वेचा व देवावरील विश्वासाचा भाग प्रकर्षाने दिसतो. वारली चित्रांचे वैशिष्टये म्हणजे एकाच चित्रात अनेक विषंयाचे एकत्रीकरण असते. उदा. लग्नाच्या चित्रातच झोपडी बांधण्याचा, ताडी काढण्याचे चित्र, जत्रेतील रहाटपणा, मुक्तपणा व जोरकसपणा जाणवून येतो.

### *मर्यादा किंवा धोका –*

आज धार्मिक व पारंपारिक संकेत कल्पनांना विसरून वारली चित्रकार नव्या पद्वतीने चित्रे काढू लागले आहेत. संस्कृती परंपरेतून वारली चित्रकलेने स्वतंत्र शैली निर्माण केली आहे. परंतु अलिकडे मात्र त्यातला सूचक अर्थ हरवला आहे. या चित्रांना राष्ट्रीय पातळीवर पारितोषिके मिळाली आहेत. परंतु पूर्वीच्या पारंपारिक मिळाली आहेत. परंतु पूर्वीच्या पारंपारिक हेतू व भाव पुसला जाउुन त्यात बाजार, विक्री, व्यापार या सारखे हेतू निर्माण झालेले आहेत. वारली चित्रकलेतील परंपरागत बाज, बांधा, त्यातील सांकेतिकता नष्ट होताना दिसत आहे. शहराच्या जवळ असल्याने ठाणे जिल्हयातील आदिवासीमध्ये वेगाने बदल किंवा स्थित्यंतरे घडत आहेत. शॉर्टकट्स निर्माण झाले आहे. अशा परिस्थितीत चित्रकलेचे पारंपरिक रूप जवळपास नष्ट होत चालले आहेत.

### *निष्कर्ष –*

1.वरली चित्रकले मागे उत्स्फूर्तता व सहजता ही वैशिष्टये दिसते.
2.मुख्यतः लग्न समारंभानिमित्त ही चित्रे काढतात.
3.झोपडीच्या अंर्तभागात मुद्याम विशिष्ट पद्वतीने सारवून तयार केलेल्या भिंतीवर चित्रे काढली जातात.
4.जीवनातील वास्तव व कल्पनामरम्यता यांचा मिलाप यांच्या चित्रकलेत दिसतो.
5.चित्र काढण्याचे काम दैवी शक्तीच करून घेत आहे अशी चित्र काढणाऱ्याची मनोमन भावना असते.
6.वारली चित्रकार ही धवलेरी स्त्रिया असतात.
7.विशिष्ट विधी करून म्हणजे स्नान, पूजा करून व चित्र काढणाऱ्याने उपवास करून अत्यंत पवित्र व सश्रद्व भावनेने ही चित्रे काढलेली असतात.

### *ग्रंथ :–*

*1 मराठी विश्वकोष, खंड 16 वा वाद्यपृंद ते विज्ञानशिक्षण – संपादक मे. पु. रेगे.*
*2 भारतीय संस्कृतीकोश खंड 8 वा राजस्थन ते विहार –– संपा. पं. महादेवशास्त्री जोशी*
*3 महाराष्ट् संस्कृतीकोष –––– संपादक डॉ. दुर्गा दिक्षित*
*4 सस्कृती – निसर्ग व जीवनशैली –––– डॉ. शौनक कुलकर्णी*
*5 भारतीय आदिवासी विकासाच्या समस्या –––7 प्रा. डॉ. प्रभाकर मांडे*
*6 वारली चित्र संस्कृती –––– डॉ. गोविंद गरे*